# समुदायवाद आणि व्यक्तीस्वातंत्र्य

**दिपक रामचंद्र सावंत** संशोधक विद्यार्थी राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

---

**सारांश :**

व्यक्तिवाद आणि साम्यवाद यांच्यातील चर्चेच्या केंद्रस्थानी न्याय्य राज्य कसे विकसित होईल व्यक्तींचे कल्याण किंवा आदर्श समाज कसा साकारायचायाचे चिंतन आहे . व्यक्ती आणि समुदाय यांच्या परस्परसंबंधांविषयी सखोल चिंतन आहे. समुदायवाद ही राजकीय विचारधारा म्हणून सामुदायिक हिताला प्राधान्य देते. व्यक्तीपेक्षा समुदायाचे हित महत्वाचे असल्याचे मानते. समुदाय वादाच्या मते व्यक्ती ही समुदायापासून स्वायत्त राहू शकत नाही. व्यक्ती ही समुदायाच्या प्रभावातून विकसित होते.त्यामुळे व्यक्तीस्वातंत्र्य हे सामुदायिक हितापेक्षा अधिक महत्वाचे नाही परंतु सामुदायिक मर्यादेत व्यक्तीला मुलभूत स्वातंत्र्य असले पाहिजे असे प्रतिपादन सामुदायवादामध्ये करण्यात आले आहे.

**प्रस्तावना :**

'समुदायवाद' या शब्दाचा सर्वप्रथम वापर गुडविन बारम्बी यांनी केलेला आढळतो. हेवूड समुदायवादाला विचारधारा न मानता सैद्धांतिक प्रवृत्ती मानतात. समुदायवाद व्यक्तिवादाला विरोध करून राजकीय जीवनातील समुदायाच्या महत्त्वावर भर देतात. राजकीय संस्थांच्या विकासात समुदायाचे महत्त्वपूर्ण स्थान असते, यावर जोर देतात. मायकल सॅण्डल, माइकल वॉल्जर, एलीस्डेयर मॅकेन्टायर,डेनियल बेल आणि चार्ल्स टेलर हे समुदायवादाचे समर्थक मानले जातात. इंग्रजीतील Community शब्दापासून Communitarian हा शब्द बनला आहे. Community म्हणजे समूह आणि Communitarian म्हणजे समूहाला महत्त्व देणारा विचार, हा समुदायवादाचा शब्दशः अर्थ सांगता येतो. विशिष्ट भूभागात दीर्घकाळापासून निवास करणाऱ्या आणि परस्परांच्या सहकार्याने जगणाऱ्या व्यक्तिगटाला समुदाय असे म्हणतात. समान जीवनमूल्य असणाऱ्या आणि विशिष्ट ध्येय, हितसंबंधांनी एकत्र येणाऱ्या व्यक्तिगटालादेखील समुदाय असे म्हटले जाते. उदारमतवादी असे मानतात की, प्रत्येक व्यक्तीला आपले हित-अहित योग्य प्रकारे समजत असल्यामुळे समाज व राज्याने व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार विकास घडवून आणण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य द्यावे. व्यक्तीच्या जीवनात हस्तक्षेप करू नये, असे विचार व्यक्त करून व्यक्तीला प्राधान्य देतात. समुदायवादी नवउदारवाद्यांच्या उपरोक्त विचारांना विरोध करतात. समुदायवाद्यांच्या मते, व्यक्ती ही समुदायाचा अविभाज्य भाग असल्यामुळे तिचा स्वतंत्रपणे विचार शक्य नाही. म्हणून व्यक्तीला समाजापासून स्वतंत्र मानून स्वातंत्र्याचा अधिकार दिला जाऊ शकत नाही. समुदायवाद म्हणजे प्रत्येक समाजाच्या अंतर्गत सहभागी व्यवहार आणि विश्वासाला महत्त्व देणारा विचार आहे.

**उद्देश :**

समुदायवाद ही राजकीय विचारधारा समजून घेऊन त्यातील विवध पैलुंचा अभ्यास करणे आवश्यक आहे.समुदाय वादाचे प्रमुख वैशिष्ट्ये सविस्तर समजून घेणे व सामुदाय वादातील व्यक्तिस्वातंत्र्याबद्दलची भूमिका चिकित्सक पद्धतीने तपासून पाहणे व त्याचे सविस्तर विश्लेषण करणे हे प्रस्तुत लेखनाचे मुख्य उद्देश आहे.

**सूचक शब्द:**

व्यक्तिस्वातंत्र्या,समुदायवाद, नवउदारमतवाद, बंधुता, समानता, राज्यसंस्था.

**विषय विवेचन :**

व्यक्तिविकास हा स्वतंत्र स्वरूपात होऊ शकतो, या संकल्पनेला समुदायवादी मान्य करीत नाही. व्यक्ती हा समुदायाचा एक सदस्य असतो. त्यामुळे तो समुदायापासून नियमाविरुद्ध जाऊ शकत नाही. समाजापासून स्वतंत्र असे व्यक्तीला अस्तित्व नसते. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास समाजांतर्गतच होऊ शकतो. व्यक्तिविकासाचा रस्ता समुदायातून जात असल्यामुळे व्यक्तीचा विकास समुदायाची अवहेलना करून केला जाऊ शकत नाही. समुदायाचा व्यक्ती घटक असल्यामुळे समुदायातील प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्याचा योग्य उपभोग घेता यावा, म्हणून राज्याला व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर योग्य व उचित मर्यादा लादण्याचा अधिकार आहे. अशा पद्धतीने उदारवादी व्यक्तीला महत्त्वपूर्ण स्थान देतात अणि समुदाय म्हणजे व्यक्तीचे एक संघटन आहे असे मानून, त्याला कमी महत्त्व देतात. समुदायवादी समुदायाला महत्त्वपूर्ण मानतात. व्यक्ती समुदायद्वारा निर्मित आहे वा समुदायाचा अंश आहे असे मानतात. उदारवादी न्यूनतम राज्याचे समर्थन करतात. तर समुदायवादी राज्याच्या सार्वजनिकवादाचे समर्थन करतात. सामाजिक जीवन आणि नागरिकतेला महत्त्व देतात. उदारमतवादी सीमित राज्याची कल्पना मांडतात, तर समुदायवादी नागरिकांच्या गरजापूर्ती करणाऱ्या राज्याचे समर्थन करतात. त्यासाठी राज्याकडे विशेष जबाबदाऱ्या सोपवितात. उपरोक्त विवेचनावरून असे सांगता येईल की, उदारमतवाद आणि समुदायवाद ह्या परस्परविरोधी विचारप्रणाली आहेत.

समुदायवाद मूलतः नव उदारमतवादी भूमिकेला प्रतिक्रिया म्हणून पुढे आल्याने ते समजून घेण्यासाठी उदारमतवादाचे वैशिष्ट्ये समजून घेणे आवश्यक आहे.

**नवउदारमतवादाची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :**

१. व्यक्तीला प्रकृतीकडून अधिकार प्राप्त होत असल्यामुळे व्यक्तीचे अधिकार जन्मजात असतात; कारण ते व्यक्तीला जन्मतः प्राप्त होतात.

२. व्यक्तीचे अधिकार जन्मजात असल्यामुळे, ते हिरावून घेण्याचा अधिकार वा प्रतिबंध लादण्याचा अधिकार समाज व राज्याला नाही.

३. स्वातंत्र्यावर केवळ संरक्षणाच्या कारणावरून राज्याला प्रतिबंध लादता येतील.

४. राज्याचे कार्य न्यूनतम स्वरूपाचे असले पाहिजे. रॉबर्ट नॉजिकसारखे अभ्यासक न्यूनतम राज्याची (Minimal State) संकल्पना मांडतात. न्यूनतम राज्य म्हणजे राज्याने संरक्षण क्षेत्रापुरते आपले काम सीमित ठेवावे. व्यक्ती राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त होत नाही, तोपर्यंत आपल्या इच्छेनुसार प्रगती करू शकत नाही, म्हणून राज्याचा व्यक्तिजीवनात कमीतकमी हस्तक्षेप असावा.

५. अर्थव्यवस्था स्वतंत्र, मुक्त व बाजार व्यवस्थेवर आधारित असावी. राज्याचा अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप नसावा.

**समुदायवादाची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :**

१. व्यक्तीचे अस्तित्व स्वतंत्र नसून ते समाज वा समुदायाद्वारे निर्माण होत असते. व्यक्ती समाजात जन्माला येत असते आणि तिची जडणघडण समुदायाने निर्माण केलेल्या सांस्कृतिक वातावरणात होत असते.

२. व्यक्तीजवळ प्राकृतिक वा अहस्तांतरित स्वरूपाचे अधिकार नसतात. व्यक्तीला राज्य आणि समाजाने अधिकार दिलेले असल्यामुळे त्यावर उचित व योग्य मर्यादा बंधनकारक असते.

३. व्यक्तीजवळ अहस्तांतरित कर्तव्ये असतात. त्यामुळे कर्तव्यांचे पालन करणे व्यक्तीवर लादण्याचा अधिकार राज्य व समाजाला असतो.

४. समुदायवादी लोकतांत्रिक स्वरूपाच्या राज्याला मान्यता प्रदान करतात. या राज्याला
नागरिक काळानुरूप आकार देत असतात असे मानतात.

५. समुदायवादी उत्तरदायी स्वरूपाच्या राज्याला मान्यता देतात. ज्या प्रकारे राज्य व्यक्तीला उत्तरदायी असते, तसेच राज्याचा सदस्य व्यक्तीदेखील राज्याचा उत्तरदायी असतो.

**समुदायवाद आणि व्यक्तीस्वातंत्र्य :**

उदारमतवादी व्यक्तिवादावर जास्त जोर देतात, हा समुदायवाद्यांच्या जास्त चिंतनाचा विषय आहे. उदारमतवादी व्यक्तीला सार्वभौम मानून तिला आपल्या इच्छेप्रमाणे शुभ जीवन घडविण्याचा वा स्वातंत्र्याच्या उपभोगाचा पूर्ण अधिकार देण्याचे समर्थन करतात. समुदायवाद्यांच्या मते व्यक्तिगत स्वातंत्र्य वा व्यक्तिजीवनाचा विकास हा समुदायांतर्गत संभव आहे. व्यक्तीचा विकास आणि कल्याण हे समाजावर अवलंबून आहे, असे आपण गृहीत धरत असाल तर समाजाचे सामान्य हित कायम राहील हे लक्षात घेऊन स्वातंत्र्याचा वापर केला पाहिजे. समुदायवादी व्यक्तीचे समुदायाप्रति दायित्व व कर्तव्यावर भर देतात. त्यामुळे उदारमतवाद्यांकडून केल्या जाणाऱ्या अधिकारवादी राजकारणाच्या ठिकाणी सामान्य हिताच्या राजकारणावर भर देतात. अधिकाराच्या राजकारणाला सामान्य हिताच्या राजकारणाशी जोडण्याचा प्रयत्न करतात. सामान्य हिताची संकल्पना उदारवादात अंतर्भूत आहे, परंतु तिची नव्याने व्याख्या करण्याची गरज आहे. सामान्य हिताच्या राजकारणासाठी उदारवाद्यांनी सांगितलेल्या तटस्थ राज्य सिद्धान्ताला सोडण्याची गरज आहे. समुदायवादी समाजाच्या सामान्य हिताला उत्तम जीवनाच्या तात्त्विक संकल्पनेच्या रूपात मानतात. सामान्य हित एक मापन उपलब्ध करून देते की, त्यांच्या आधारावर समाजातील वरीष्टत्वाचे मूल्यांकन करता येते.

अशा पद्धतीने समुदायवादी अभ्यासक स्वातंत्र्य संकल्पनेला मान्य करतात. परंतु उदारमतवादी अभ्यासकांनी विशद केलेल्या स्वातंत्र्य -संकल्पनेची पुनर्व्याख्या करण्याची गरज आहे व स्वातंत्र्य -संकल्पनेतील अग्रक्रम बदलण्याचा प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे समुदाय वादी मानतात.

समुदायवाद आणि उदारमतवाद ह्या परस्परविरोधी विचारसरणी मानल्या जातात. दोन्ही विचारधारांमध्ये व्यक्ती अधिक महत्त्वपूर्ण की समुदाय अधिक महत्त्वपूर्ण या मुद्द्यांवरून मतभेद आहेत. वास्तविक दोन्ही विचारधारा व्यक्तिगत स्वातंत्र्याचे समर्थन करतात; परंतु व्यक्ती समुदायाशी जोडलेला आहे की समुदायापासून स्वतंत्र आहे, हादेखील दोन्ही विचारधारांमधील मतभेदाचा प्रमुख मुद्दा मानला जातो. उदारवादी मानतात की, व्यक्ती हा जन्मतःच स्वतंत्र असल्यामुळे तो आपल्या हिताची परिपूर्ती करू शकतो. आपल्या चांगल्या जीवनाविषयीची परिकल्पना व योजना स्वतः तयार करू शकतो. मानव परिपूर्णताप्राप्त प्राणी आहे. त्यामुळे राज्य आणि समुदायाने व्यक्तीच्या विकासासाठी नियोजन करण्याची आवश्यकता नाही. कोणत्याही व्यक्तीबाबत निर्णय घेण्यासाठी त्या व्यक्तीबद्दल पूर्ण ज्ञान असले पाहिजे. पूर्ण सामाजिक ज्ञानाशिवाय कोणती व्यक्ती वा संस्थेद्वारा दुसऱ्या व्यक्तीसाठी बनविलेली योजना वा निर्णय निरर्थक ठरेल. कारण पूर्ण सामाजिक ज्ञान प्राप्त करणे अशक्य आहे. व्यक्ती

सामाजिक ज्ञान प्राप्त करण्यास अक्षम आहेत असे नाही, तर सामाजिक ज्ञान पूर्ण स्वरूपात उपलब्ध नाही हे आहे. सामाजिक ज्ञान प्राकृतिकदृष्ट्या अपूर्ण, विखुरलेले, विकेंद्रित स्वरूपात आहे. सामाजिक ज्ञान केंद्रीकृत नसल्यामुळे प्रत्येक व्यक्ती आपल्यासाठी आवश्यक ज्ञान प्राप्त करू शकते आणि त्या आधारावर आपल्या शुभ व विकासाची योजना तयार करू शकते. अशा प्रकारे उदारवादी व्यक्तीच्या क्षमतेवर विश्वास व्यक्त करतात. व्यक्तीला सार्वभौम मानल्यामुळे त्यांच्या कृतीवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार राज्याला देत नाही. व्यक्ती स्वतंत्रपणे आपल्या विकासाचा मार्ग निश्चित करू शकते, हा विश्वास व्यक्त करून तिच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचा वा हस्तक्षेप करण्याचा अधिकार राज्याला देत नाहीत.

**समुदायवादाचे चिकित्सक परीक्षण :**

१. समुदायवादी विचारधारा रूढिवादी व सत्तावादी आहे असा आक्षेप घेतला जातो. समुदायवादी विद्यमान सामाजिक संघटन व नैतिक नियमांना टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतात.

२. स्त्रीवादी अभ्यासकांच्या मते, समुदायवादी विचारधारा रूढिवादी विचारधारा आहे. समाजातील रूढी, परंपरा यांत परिवर्तन घडवून आणण्यास विरोध करतात. रूढी व परंपरेमुळे होणाऱ्या स्त्री व वंचित वर्गाच्या होणाऱ्या स्वातंत्र्याच्या गळचेपिकडे दुर्लक्ष करतात.

३. समुदायवादी विचारधारा व्यक्तीच्या स्वातंत्र्य व अधिकारांची उपेक्षा करतात. व्यक्तीला स्वातंत्र्याचे समर्थन करण्याऐवजी समुदायाच्या स्वातंत्र्यावर भर देतात. व्यक्तीच्या अधिकाराऐवजी कर्तव्य व उत्तरदायित्व निभावण्यावर भर देतात.

४. समुदायवादी सामाजिक व राजकीय यांच्यातील सीमारेषा पुसट करतात. समुदायाचा सदस्य ही व्यक्तीची ओळख मानतात, तर नागरिकत्वातून तिचा औपचारिक राजकीय दर्जा व्यक्त होतो. परंतु समुदायाचे सदस्यत्व हे व्यक्तिगत व सामाजिक स्वरूपाचे असते. नागरिकत्व हे कायद्याद्वारे व्यक्तीला प्राप्त होत असते. समुदायवादी राजकीय क्षेत्र सामाजिक व व्यक्तिगत क्षेत्राशी जोडण्याचा प्रयत्न करतात. हा त्यांचा प्रयत्न सार्वजनिक आणि खाजगी जीवनाची सरमिसळ करणारा आहे, असे टीकाकारांना वाटते.

५. समुदायवादी नेमकी व सुस्पष्ट व्याख्या तिच्या पुरस्कर्त्यांना करता आली नाही. राजकीय जीवन व नागरी जीवनाची एवढ्या मोठ्या प्रमाणात सरमिसळ करतात की या दोन्ही संकल्पनांतील तात्त्विक व सूक्ष्म भेद नष्ट होतो असे उदारवाद्यांना वाटते.

६. समुदायवाद्यांची राज्यविषयक भूमिकादेखील सर्वकषवादाच्या जवळ जाणारी वाटते. राज्याकडे पालकत्वाची भूमिका सोपवतात. नागरिकांच्या नीतिविषयक व अग्रक्रम ठरविण्याचा वा ते चुकीचा ठरविण्याचा अधिकार देतात.

७. समुदायवादी समुदाय आणि त्याच्या सांस्कृतिक परंपरा यांत समन्वय प्रस्थापित करण्याची कसरत करतात. परंतु दोन्हींमध्ये समन्वय प्रस्थापित करणे अत्यंत अवघड काम असल्याचे प्रत्यक्षात समुदायवादी विवेचनाचा अभ्यास केल्यानंतर लक्षात येते. त्यांनी केलेला समन्वय अत्यंत कुचकामी व अशास्त्रीय स्वरूपाचा जाणवतो.

**निष्कर्ष :**

समुदायवाद जरी व्यक्ती ला दुर्लक्षित करून समुदाय या सामुहिक घटकाकडे लक्ष देत असला तरी समुदायवादी विचारधारेचे महत्त्व कमी लेखता येणार नाही. या विचारधारेने राजकीय प्रक्रियेतील समुदायाचे महत्त्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मानवी जीवनातील अतिव्यक्तिकेंद्री आणि व्यक्तीच्या स्वायत्ततेचे गुणगान करणाऱ्या नवउदारवादी विचारधारेच्या उणिवा उजागर करून समुदाय वादी भूमिकेचे महत्व अधोरेखित केले आहे. समुदाय वादामध्ये व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने न आणता समुदायाच्या सार्वजनिक हिताच्या मर्यादेत व्यक्तीस्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे असे मत व्यक्त केले आहे.

**संदर्भ :**

१) Heywood Andrew, (2014), "Political Ideologies -An Introduction",Palgrave Macmillan Publication,U.K.

२) Gauba O.P, An Introduction to Political Theory, Mayur Paperbacks, Delhi.

३) Gauba O.P, "Contemporary Political Ideologies", National Paperbacks, New Delhi.

४) Graham Paul, "Rawls- A beginners guide", Oneworld Publication London.

५) बिरमल नितीन, पवार वैशाली ,(२०१५) " राजकीय विचारप्रणाली",जेन्रिक पब्लिकेशन.

६) आवटे श्रीरंजन, "विसाव्या शतकातील राजकीय विचार", सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.